PS

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): वाशिम    P.S. (पोलीस ठाणे): वाशिम    Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0769    Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 23/07/2026 03:12 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(b) |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): बुधवार    Date from (दिनांक पासून): 22/07/2026    Date To (दिनांक पर्यंत): 22/07/2026

Time Period (कालावधी): प्रहर ६    Time From (वेळेपासून): 16:51 तास    Time To (वेळेपर्यंत): 17:03 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):    Date (दिनांक): 23/07/2026    Time (वेळ): 02:13 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):    Entry No. (नोंद क्र.): 005    Date and Time (दिनांक आणि वेळ): 23/07/2026 02:13 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): उत्तर, 1 कि.मी.    Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): लघु पाटबंधारे विभाग वाशिम , वाशिम ,वाशिम

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): पोनी सुलभा प्रल्हाद राउत

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1983

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाललुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम, वाशिम , वाशिम, वाशिम, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाललुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम, वाशिम , वाशिम, वाशिम, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-9922061123

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | हेमंतकुमार दगाजी चव्हाण | | | 1. प्लॉट क्र 602 पंढरीनाथ कॉम्प,एनडीए रोड,शिवने पुणे,Town/Village (शहर / गाव): पुणे,Tehsil (तहसील): पुणे,Police Station (पोलीस ठाणे): उत्तमनगर,District (जिल्हा): पुणे शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या 10 नोटा | 5,000.00 |

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) : 5,000.00

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

फिर्याद

लापवि वाशिम

दिनांक -

२३/०७/२०२६नांव:- सुलभा प्रल्हाद राऊत, वय ४३ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद पोलीस निरीक्षक,

प्रतिबंधक विभाग वाशिम, मो.नं. ९९२२०६११२३मी आज
लाचलुचपत
रोजी सरकारतर्फे समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंध विभाग वाशिम येथे पोलीस निरीक्षक म्हणून १६/०६/२०२६ पासून कार्यरत आहे. दि. २२/०७/२०२६ रोजी तापवि कार्यालय वाशिम येथे कर्तव्यावर हजर असताना तकारदार कार्यालयात हजर आले त्यानी त्यांचे नाव मंगेश अशोक मोरे वय ३५ वर्षे, व्यवसाय शेती रा कौलखेड ता लोणार जि. बुलढाणा असे सांगून लाचमागणी बावत तकार असल्याचे सांगीतले त्यानंतर आम्ही मा उपवनसंरक्षक अधिकारी, वन विभाग, वाशिम यांच्या अंतर्गत असलेले कार्यालय मा. वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक, वाशिम याचे कार्यालयातुन दोन सरकारी पंच क१) वी वैभव विजय पळसकर २)श्री अक्षय मदन दाभाडे असे प्राप्त केले. दोन्ही पंचाना तकारदार यांचा परिचय करून दिला त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना तकार लिहुन देण्यास सांगीतले असता तकारदार यानी सागीतले की त्याना मराठी वाचता येते व लिहीता येते त्यामुळे आम्ही तकारदार यांना त्यांची तकार कथन करुन स्वाहस्ताक्षरात लिहुन देण्यास सोगीतले. तक्रारदार यांनी कथन केलेली व स्वहस्ताक्षरात लिहलेली तकार ती पुढीलप्रमाणे मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय वाशिम येथे समक्ष येऊन तक्रार देत आहे की, मी वरील ठिकाणी राहत असुन शेती करतो मी ग्रामपंचायत वढव कौलखेड ता. लोणार जि.वाशिम येचे ग्रामपंचायत सदस्य आहे माझे शिक्षण १२ वी पर्यंत झाले आहे मौजे कौलखेड गावाचे पुनर्वसन सन २००५ ते २००६ मध्ये लघु पाटबंधारे विभाग बोराखेडी ता रिसोड जि. वाशिम प्रकल्प अतंर्गत झालेले आहे. नविन ठिकाणी गांव स्थलांतरीतकरिता प्रत्येक कंट्याला एक प्लाट वाटप करण्याची तरतुद आहे. परंतु मला व माझे गावातील ईतर पाच लोकांना प्लॉट मिळालेला नसल्यामुळे मी दि.१७.०७.२०२६ रोजी श्री हेमंतकुमार चव्हाण, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, वाशिम यांना उर्वरित प्लॉट मिळणेबाबतचा विनती अर्ज स्वतः भेटुन दिला व त्याना विनती केली की, साहेब आम्हाला शिलयक असलेले प्लॉट देण्यात यावे त्यावर त्यांनी मला सांगीतले की, मी शिल्लक असलेले प्लॉट वाटप करण्याचा शिफारस पत्र मा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा याना सादर केलेला आहे असे मला चव्हाण यांनी सांगीतले. त्याकामाचा मोबदला म्हणून श्री चव्हाण यांनी मला ३०,०००/- रुपयेची मागणी केली आहे ,दि.१७.०७.२०२६ रोजी मी दिलेल्या अर्जावर श्री हेमंतकुमार चव्हाण यांनी मा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांना सादर केलेल्या पत्र पाठविल्याबाबतच्या कामाच्या मोबदल्याकरिता ३०,००० रुपये लाचेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले, माझी त्यांना पैसे देण्याची इच्छा राही हेमंतकुमार चव्हाण साहेब, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग वाशिम यांच्याशी माझा कोणताही देण्याघेण्याचा किवा उसणवारीचा व्यवहार नसून आपसी दुश्मनी नाही हेमतकुमार बव्हाण साहेब यांच्यावर कारवाई करावी या करीता तक्रार देत आहे. त्याच्यावर कारवाई होणेस विनंती आहे. मी तकारीसोबत विनती अर्ज, ग्रामपंचायत ठरावाची दोरॉक्स प्रत देत आहे. दि.२२.०७.२०२६ रोजी मला हेमतकुमार बव्हाण यांनी कार्यालयात पैसे घेवुन बोलविले असल्याने दि.१७.०७.२०२६ पासुन मी वाशिम येथे आलो नाही. त्यामुळे तकार देण्यास उशिर झाला. सदर तकारीवर तकारदार यांनी स्वतः व दोन्ही पंचानी तसेच समक्ष म्हणुन मी सुध्दा सही केली. आम्ही तकारदार यांना हेमंतकुमार चव्हाण, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, वाशिम हे लाच मागणी करतात किवा नाही? हे पडताळणी करणे आवश्यक असल्याचे सांगीतले. तक्रारदार यांना हेमंतकु मार चव्हाण, कार्यकारी

अभियंता हे कोठे भेटतील अशी विचारणा केली असता तक्रारदार यांनी सांगीतले की, हेमंतकुमार चव्हाण, कार्यकारी अभियंता हे लघु पाटबंधारे विभाग, वाशिम येथील त्यांचे कार्यालयात भेटतील तकारदार यांना हेमंतकुमार चव्हाण, कार्यकारी अभियंता हे दि.२२/०७/२०२६ रोजी लघु पाटबंधारे विभाग, वाशिम येथील त्यांच्या कार्यालयात भेटी दरम्यान सन २००५ ते २००६ मध्ये बोराखेडी ता. रिसोड जि. वाशिम येथील तलावासाठी पुनवर्सन करण्यात आलेले ग्राम कौलखेड ता. लोणार जि. बुलढाणा येथील शिल्लक असलेले प्लॉट वाटप करण्याचे शिफारस पत्र मा.जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांना सादर केल त्याकामाचा मोबदला म्हणुन तकारदार यांना ३०,००० रुपयाची लाचेची मागणी करतात किंवा कसे? याबाबतची पडताळणी करणे आवश्यक आहे. हेमंतकुमार चव्हाण, कार्यकारी अभियंता यांची आज दि.२२/०७/२०२६ रोजी लघु पाटबंधारे विभाग, वाशिम येथील त्यांच्या कार्यालयात भेट होणार असल्याने सदरची तक्रार पडताळणी कार्यवाही दि.२२/०७/२०२६ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरले. तसेच पंच क.०१ श्री. वैभव विजय पळसकर यांना तक्रारदार यांचे सोबत पाठविण्यात येणार असल्याचे आम्ही सांगीतले. सदरचा पडताळणीपुर्व पंचनामा पुर्ण करण्यात आला. त्यानंतर पडताळणी कारवाई दरम्यान आम्ही पंच क.०१ व तकारदार यांना हेमंतकुमार चव्हाण, कार्यकारी अभियंता यांची भेट घेण्यासाठी पाठविण्यात येणार असल्याचे सांगीतले. तसेच तक्रारदार यांचे शर्टाचे आतुन व्हाईस रेकॉडर लावले व पंच क.०१ यांचे खाजगी दुचाकीने हेमंतकुमार चव्हाण, कार्यकारी अभियंता यांची भेट घेणेकामी लघु पाटबंधारे विभाग वाशिम येथील त्यांच्या कार्यालय १५.४१ वा. चे सुमारास रवाना केले. आम्ही व पंच क्र.२ तसेच स्टाफ असे ला.प्र.वि. कार्यालय वाशिम येथे थांबून राहिलो. १६.०० वा. चे दरम्यान तकारदार व पंच क्र.१ हे पंच यांचे खाजगी वाहनाने ला.प्र.वि कार्यालय वाशिम येथे परत आले. पंच क.०१ व पंच क०२ यांच्या समक्ष तक्रारदार यांना घडलेल्या हकीकत बाबत विचारणा केली असता तकारदार यांनी सांगीतले की पंच क.०१ सह ते लघु पाटबंधारे विभाग वाशिम येथील हेमंतकुमार चव्हाण, कार्यकारी अभियंता याचे कार्यालया भेट झाली. भेटी दरम्यान तकारदार व हेमंतकुमार चव्हाण, कार्यकारी अभियंता यांच्यात केलेल्या कामासंबंधी व त्यांच्या मोबदल्यासंबंधी बोलणी झाली त्यामध्ये हेमंत चव्हाण म्हणाले एक त वाढुन देलं आजुन त्यातले पण दहा दया.. त्यावर तक्रारदार म्हणालो नाही ओ साहेब... त्यावर हेमंत चव्हाण म्हणाले एकतं पण आहो चारचं शिल्लक पाच त दिलं ना त्याचे त्याचेकडं त्याचेबी दहा दया तुम्हालं असं म्हणतो मी... त्यावर तक्रारदार म्हणालो तुम्हालं देलेनं पहीले काही मी.. त्यावर हेमंत चव्हाण म्हणाले विसंच देले नं.. त्यावर तक्रारदार म्हणालो बरं थोड्यावेळानं देतो.. आता किती आणायचे सांगा म्हणजे डबल आता... त्यावर हेमंत चव्हाण म्हणाले विस आणा विस... त्यावर तक्रारदार म्हणालो विस.. त्यावर हेमंत चव्हाण म्हणाले तुम्हालं तं तिस सांगीतले पण तुम्ही आता जाउदे आता काय हे तं... त्यावर तक्रारदार म्हणालो ठिक हे.. येतो घेउन आं.. त्यावर हेमंत चव्हाण म्हणाले हो. हेमंत बव्हाण व तक्रारदार यांच्यात वरील प्रमाणे बोलणे झाले.पडताळणी कार्यवाही दरम्यान तक्रारदार व हेमंतकुमार चव्हाण यांचेत झालेल्या संभाषणा नुसार हेमंतकुमार चव्हाण यांनी तक्रारदार यांना सन २००५ ते २००६ मध्ये बोराखेडी ता. रिसोड जि.वाशिम येथील तलावासाठी पुनवर्सन करण्यात आलेले ग्राम कौलखेड ता. लोणार जि. बुलढाणा येथील शिल्लक असलेले प्लॉट वाटप करण्याचे शिफारस पत्र मा. जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांना सादर केल त्याकामाचा मोबदला म्हणुन तकारदार यांना ३०,००० रुपयाची लाच

मागणी करुन आज रोजी स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने सापळा कारवाई आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले आहे.दि.२२/०७/२०२६ रोजी सापळा कारवाई ही लघु पाटबंधारे विभाग, वाशिम येथे करण्याचे ठरल्याने सापळा कारवाई दरम्यान तकारदार व पंचाना सुचना दिल्या. तसेच तकादार याना लाच रक्कम स्विकारल्याचा ईशारा म्हणुन त्यांचे शर्टाचे वरील खिशातील अर्जाची स्थळ प्रत उजव्या हातात घेवुन कक्षाच्या बाहेर येण्याचा इशारा सांगीतला. तकारदार यांना लाच रक्कम २०,०००/- रुपये हजर करण्यास सांगीतले असता तकारदार यांनी त्यांच्याकडे २०,०००/- रुपये रक्कम नाही असे सांगुन त्यांच्याकडे ५,०००/- रुपये असुन ती रक्कम त्यांनी आणली व ५,०००/- रुपयेच रक्कम हेमंतकुमार चव्हाण, कार्यकारी अभियंता यांना देतो अशी विनंती करुन ५,०००/- रुपये पंचासमक्ष हजर करुन त्यांच्याकडे इतकीच रक्कम असल्याचे सांगुन सदर लाच रक्कमेस अँथ्रॉसिन पावडर लावली व तक्रारदार यांचेकडे लाच रक्कम देऊन व्हाईस रेकॉर्डर त्यांचे शर्टाचे आतुन बनियानला लावला व लघु पाटबंधारे विभाग वाशिम येथे १६:५१ वा रवाना केले. सापळा पथक सुदधा लघु पाटबंधारे विभाग वाशिम येथे रवाना होऊन तेथे दबा धरुन बसले.त्यानंतर सापळा अधिकारी म्हणुन मी तक्रारदार यास पंच क. (०२) समक्ष घडलेल्या प्रसंगाबाबत क्रमवार हकिकत कथन करण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी सांगीतले की, ते पंच क. (०१) यांना घेवुन हेमंतकुमार चव्हाण यांना भेटण्यासाठी कार्यकारी अभियंता वाशिम पाटबंधारे विभाग वाशिम कार्यालयाचे इमारतीत असलेल्या कार्यकारी अभियंता लघुपाटबंधारे विभाग (बांधकाम) येथे गेले पंच क्र (०१) हे माझे मागेमागे इमारतीत पहील्या मजल्यावर असलेल्या कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग (बांधकाम) हेमंतकुमार चव्हाण यांचे कक्षा समोर आले. मी हेमंतकुमार चव्हाण यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क करुन त्यांचे कक्षात गेलो. पंच क. (१) हे कक्षाचे बाहेर थांबुन राहीले. हेमतकुमार चव्हाण हे त्यांचे कक्षात खुर्चीवर बसलेले होते. तक्रारदार हे टेबल समोर असलेल्या खुर्चीवर जावुन बसलो. तक्रारदार यांनी त्यांच्या फुलपॅन्टचे उजवे बाजुचे समोरील खिश्यातुन उजवे हाताने लाचेची रक्कम ५,०००/- रु काढून हेमंतकुमार चव्हाण यांचे समोर धरली असता हेमंतकुमार चव्हाण यांनी त्यांचे डावे हाताने अॅन्थ्रासिन पावडर लागलेली लाचेची रक्कम ५,०००/- रु स्विकारुन त्यांनी घातलेल्या काळ्या रंगाच्या फुलपॅन्टचे डावे बाजुचे समोरील खिश्यात ठेवली. त्यांनतर तकारदार यांनी हेमतकुमार चव्हाण यांना पुढचे काम पण करा बर... भिजलोनं मी... तुम्ही सांगीतल्या प्रमाणं देले बाकीचे काही अॅडजस्ट करजा काही... कमी गीमी असलेतंबाकीचे नंतर देउ काही.. असे म्हटले असता चव्हाण साहेब यांनी तुम्ही विस करणार होते नं असे म्हटले. त्यावर तक्रारदार यांनी हेमंतकुमार चव्हाण यांना ऐव्हडे देले अॅडजस्ट करजा.. असे म्हटले असता हेमंतकुमार चव्हाण यांना अरे नाही ना अॅडजस्ट नाही ना लागतीलंच.. कैंव्हा असे महटले तर तक्रारदार यांनी त्यांना दोन चार दिवसानं देतो असे म्हटले. त्यावर हेमंतकुमार चव्हाण यांनी नाही नं असं नका करु.. तुम्ही सगळेच तुकडे तुकडे करुन राहीलेत... तुम्ही आजच म्हणलं करतायत पुर्ण असं वाटलं असे म्हटले. त्यावर तक्रारदार घ्या आता धकवुन घ्या काही दोन चार दिवसानं देतो राहीलेले काही असे म्हटले. तेव्हा हेमतकुमार चव्हाण यांनी आज करुन आणले असते तं आज कशालं सोडता... मी तुम्हावालं काम केलं न असे म्हटले. त्यावर तक्रारदार यांनी हेमतकुमार चव्हाण यांना काम केल पण पुढचं सहकार्य राहु दया आता... असे म्हटले. त्यावर हेमतकुमार चव्हाण यांनी पुढचं सहकार्यच राहील नंमंग आज करुन दयानं ते असे म्हटले त्यावर

तक्रारदार म्हटले बर ठिक हे पाहतो मी कोणाजवळुन तरी फोन पे घ्या लागतील साहेब असे म्हटले. त्यावर हेमतकुमार चव्हाण यांनी घ्या मंग असे म्हटले. त्यावर तकारदार म्हटले गरीब परीस्थीतीचा जरसाक पाहजा काही असे म्हटले त्यावर हेमतकुमार चव्हाण अरे नाही ना अस नाही ना.. तुम्ही पाच झणं हे उलट पन्नास त करायलं पाहीजेत असे म्हटले. त्यांनतर तक्रारदार हे खुर्चीवरुन उठून कक्षाचे बाहेर आहे. तक्रारदार यांनी शर्टाच्या खिशात ठेवलेल्या अर्जाच्या स्थळ प्रतीची झेरॉक्स कॉपी त्यांचे उजवे ह

त्यांचे उजवे हातात घेवून कक्षाचे बाहेर येऊन सापळा पथकास दिसेल असा लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा केल्याने आम्ही व सापळा पथक यांनी हेमतकुमार चव्हाण यांचे जवळ पोहचुन त्यांच्या कडुन लाच रक्कम दोन्ही पंचासमक्ष हस्तगत केली व त्यांना ताब्यात घेतले. हेमतकुमार चव्हाण यांना पुढिल कारवाई करीता ला.प्र.वि.कार्यालय वाशिम येथे आणण्यात आले. आरोपी हेमंतकुमार चव्हाण यांचे निवेदन घेण्यात आले आहे.आरोपी हेमतकुमार दगाजी चव्हाण, वय-५६ वर्षे, व्यवसाय कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, वाशिम यांनी तक्रारदार यांना सन २००५ ते २००६ मध्ये बोराखेडी ता. रिसोड जि. वाशिम येथील तलावासाठी पुनवर्सन करण्यात आलेले ग्राम कौलखेड ता. लोणार जि. बुलढाणा येथील शिल्लक असलेले प्लॉट वाटप करण्याचे शिफारस पत्र मा. जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांना सादर केले त्याकामाचा मोबदला म्हणुन दि.२२/०७/२०२६ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान स्पष्ट ३००००/- रुपयेची लाच मागणी करुन तडजोडी अंती २००००/- रु लाच मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले. दि. २२/०७/२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान १६:५१ वा. ते १७:०३ वा. चे दरम्यान ५०००/- रु लाच रक्कम पंचासमक्ष लघु पाटबंधारे विभाग, वाशिम येथील कार्यकारी अभियंता या त्यांच्या स्वतःच्या कक्षात स्विकारली. सदर सर्व कारवाई दरम्यान आरोपी हेमंतकुमार दगाजी चव्हाण यांनी केलेले कृत्य कलम ७ (b) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे होत असल्याने माझी त्यांचे विरुध्द सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे.

सही

(सुलभा प्रल्हाद राऊत)

पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.वाशिम.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SANJAY NAMDEO CHOUDHARI (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2)

Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):

No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):
or (किंवा)

(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): SANJAY NAMDEO CHOUDHARI

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.):

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):